CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकमत

Hello Navi Mumbai
Page No. 4 Sep 07, 2024

डेब्रिजमाफियांना सिडकोचा दणका

नवी मुंबई : शहरातील मोकळे भूखंड आणि खाडी किनाऱ्यावरील खारफुटी क्षेत्रात बेकायदेशीररीत्या डेब्रिज टाकणाऱ्यांच्या विरोधात सिडकोने कंबर कसली आहे. त्या अनुषंगाने विनापरवाना डेब्रिजची वाहतूक करून बेकायदेशीरपणे त्याची विल्हेवाट लावण्याच्या बेतात असलेल्या डंपर चालकांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात येत आहेत. सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण शहरात डेब्रिज माफियांच्या विरोधात कारवाई केली जात आहे. मंगळवार, ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७:३० वाजता डेब्रिज घेऊन येणारा एक डंपर सिडकोच्या दक्षता पथकाने ताब्यात घेतला. त्यातील डेब्रिजविषयी अधिक चौकशी केली असता भूखंडावर टाकण्यासाठी जात असल्याची कबुली डंपरच्या चालकाने दिली.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकमत

Hello Navi Mumbai
Page No. 4 Sep 07, 2024

डेब्रिजमाफियांना सिडकोचा दणका

नवी मुंबई : शहरातील मोकळे भूखंड आणि खाडी किनाऱ्यावरील खारफुटी क्षेत्रात बेकायदेशीररीत्या डेब्रिज टाकणाऱ्यांच्या विरोधात सिडकोने कंबर कसली आहे. त्या अनुषंगाने विनापरवाना डेब्रिजची वाहतूक करून बेकायदेशीरपणे त्याची विल्हेवाट लावण्याच्या बेतात असलेल्या डंपर चालकांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात येत आहेत. सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण शहरात डेब्रिज माफियांच्या विरोधात कारवाई केली जात आहे. मंगळवार, ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७:३० वाजता डेब्रिज घेऊन येणारा एक डंपर सिडकोच्या दक्षता पथकाने ताब्यात घेतला. त्यातील डेब्रिजविषयी अधिक चौकशी केली असता भूखंडावर टाकण्यासाठी जात असल्याची कबुली डंपरच्या चालकाने दिली.